महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - १७२ ■ शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

✲ उत्सुकता ✲




## बागलाणमधील प्राथमिक शिक्षकांच्या समस्यासह शाळांच्या विकासासाठी प्रयत्नशील राहील -आमदार दिलीप बोरसे



**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौदळ, सटाणा प्रतिनिधी बागलाण तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित समस्या व शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहील असे प्रतिपादन आमदार दिलीप बोरसे यांनी केले किरातवाडी ( ता . बागलाण )येथील जिल्हा परिषद शाळेत केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेच्या शुभारंभप्रसंगी आमदार बोरसे बोलत होते अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी चित्रा देवरे होत्या. नवनिर्वाचित नगराध्यक्षा हर्षदा पाटील नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष सुमित वाघ , नगरसेवक राहुल पाटील ,भाजपचे तालुकाध्यक्ष शरद भामरे ,सरपंच चित्रा बागुल, उपसरपंच अनिल गायकवाड ,सटाणा बाजार समितीचे माजी सभापती नरेंद्र अहिरे ,नामपूर बाजार समितीचे उपसभापती युवराज पवार, गटविकास अधिकारी अतुल पाटील, विस्तार अधिकारी तुषार महाले, नवनाथ पवार , केंद्र प्रमुख विलास पवार ,गोविंद देवरे ,संघाचे तालुकाध्यक्ष देवा पवार, समितीचे राज्य सदस्य नितीन सोनवणे, संघाचे सरचिटणीस संतोष सावंत ,महिला आघाडी प्रमुख सुजाता गायकवाड ,मुख्याध्यापक अरुण सोळुंके चित्रा बेडीस , कक्ष अधिकारी नरेंद्र कचवे ,दीपक सोनवणे सर्व केंद्रप्रमुख प्रमुख पाहुणे होते यावेळी केंद्रातर्फे आमदार दिलीप बोरसे यांचा केंद्रप्रमुख विलास पवार नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षदा पाटील यांचा मुख्याध्यापिका चित्रा बेडीस 'नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष सुमित वाघ यांचा व्ही टी . पवार , नगरसेवक राहुल पाटील यांचा संतोष सावंत गटविकास अधिकारी अतुल पाटील यांचा संजीव पवार गटशिक्षणाधिकारी चित्रा देवरे यांचा शिक्षिका अनिता देवरे सरपंच चित्रा बागुल यांचा छाया सूर्यवंशी उपसरपंच अनिल गायड वाड यांचा शरद भामरेआदि मान्यवरांचा केंद्रातर्फे स्टील बाटली देऊन सत्कार करण्यात आला यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत बदली झालेले व बदलून आलेल्या शिक्षक शिक्षिकांचा स्टील बाटली देऊन सत्कार करण्यात आला यावेळी नगराध्यक्ष हर्षदा पाटील म्हणाल्या की ग्रामीण भागातील शिक्षक चांगले काम करतात हे कौतुकास्पद असुन शाळांच्या चेहरा मोहरा बदललेला असून शहराच्या विकासासाठी ही प्रयत्नशिल असल्याचे सांगितले बदली झालेल्या शिक्षक अमोल अहिरे ,प्रतिभा कापडणीस संतोष सांवत यांन मनोगत व्यक्त केले शिक्षण परिषद यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक शरद भामरे शिक्षिकाअनिता देवरे, राजेंद्र पाटील, व्ही टी पवार, धनराज भामरे ,अमित सोनवणे आदिनी प्रयत्न केले यावेळीकेंद्रातील सर्व शिक्षक, शिक्षिका उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक स्वप्निल जाधव तर आभार हेमंत महाले यांनी मानले

## जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची रात्रभर उमेदवारी अर्ज तपासणी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शांताराम मगर, वैजापूर प्रतिनिधी -

वैजापुर तालुक्यातील ८ जिल्हा परिषद गट व १६ पंचायत समिती निवडणुकीसाठी ३५० उमेदवारी अर्ज दाखल झाले आसुन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी रात्रभर अर्ज तपासणीचे काम युद्धपातळीवर केले. मोठ्या संख्येने दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांमुळे प्रशासनावर ताण आला असतानाही, पारदर्शक व नियमानुसार तपासणी करण्यावर भर देण्यात आला.

निवडणूक कार्यालयात उशिरापर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी आरूण जराड सहाय्यक निवडणूक निर्णय आधिकारी सुनिल सांवत, ज्ञानोबा जायभाये, हेमंत ऊशिर, विष्णु बिरेवाड, ज्ञानेश्वर वाळुंज, आर डि साठे सचिन गायकवाड, प्रविण गायकवाड,नामदेव वसाळे,आमोल निखडे, नितीन महापुरे छायाचित्र कार शांताराम मगर व कर्मचारी यांनी उपस्थित राहून प्रत्येक अर्जाची बारकाईने छाननी करण्यात आली. उमेदवारांची वैयक्तिक माहिती,जात वैधता प्रमाणपत्र,थकबाकी नसल्याची कागदपत्रे,प्रतिज्ञापत्र तसेच निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या अटींची पूर्तता झाली आहे की नाही याची सखोल तपासणी करण्यात आली. अर्ज तपासणीदरम्यान काही उमेदवारांच्या अर्जात त्रुटी आढळून




आल्याने त्यांना सुधारणा करण्याची सूचना देण्यात आली. तर नियमांची पूर्तता न करणाऱ्या अर्जांवर आक्षेप नोंदविण्याची प्रक्रिया देखील पार पाडण्यात आली. कोणताही अन्याय होऊ नये यासाठी सर्व पक्षांचे प्रतिनिधी व उमेदवार उपस्थित ठेवून पारदर्शकता जपण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितले की,निवडणूक प्रक्रिया विश्वासार्ह व निष्पक्ष राहावी यासाठी अर्ज तपासणी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे वेळेची पर्वा न करता रात्रभर काम करून सर्व अर्जांची तपासणी पूर्ण करण्यात आली. दरम्यान,तालुक्यात अनेक गट व गणांमध्ये अपेक्षेपेक्षा जास्त उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवडणूक लढती रंगतदार होण्याची चिन्हे आहेत. काही ठिकाणी पक्षीय तर काही ठिकाणी अपक्ष उमेदवारांची संख्या वाढल्याने मतदारांपुढे अनेक पर्याय उपलब्ध होणार आहेत. अर्ज तपासणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम वैध उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येणार असून, त्यानंतर उमेदवारी माघारीची प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानंतरच निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

## दावोसमध्ये महाराष्ट्राचे ३० लाख कोटींचे सामंजस्य करार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दावोस, दि. २२ : दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने ३० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून, आणखी १० लाख कोटींच्या गुंतवणूक करारांची प्राथमिक बोलणी पूर्ण झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना दिली. यातून ४० लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील पत्रकारांशी त्यांनी व्हीसीच्या माध्यमातून संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. या करारांपैकी ८३ टक्के करारांमध्ये थेट परकीय गुंतवणूक असून, एकूण १८ देशांमधून महाराष्ट्रात ही गुंतवणूक येते आहे. १६ टक्के गुंतवणूक ही परकीय तंत्रज्ञान भागिदारीत आहे.

## केनवडे फाटा येथे मध्यरात्री पाच दुकाने फोडली रोख रक्कमेसह, साहित्याची चोरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

जे.के. गोरंबेकर / गोरंबे - केनवडे फाटा ता.कागल येथे बुधवार दि.२१ रोजी मध्यरात्री चौकातील मुख्य रस्त्यावर वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या चहा कॅपे,मोबाईल शॉपीसह जनावारांच्या औषध दुकानात मोठी चोरी झाल्याने लाखो रूपयाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक आंदाज आहे.

याबाबत अधीक माहिती अशी, केनवडे फाटा येथील मुख्य चौकात रस्त्यालगत असलेल्या युवराज राजिगरे यांच्या नवतरंग मोबाईल रिपेरिंग या दुकानाचा पाठीमागील पत्रा उचकटून दुरूस्तीसाठी आलेले मोबाईल फोन,मेमरीकार्ड,पेनड्राईव्ह यासह मोबाईल अक्सेसेरिज अशा सुमारे ८०००-/ रूपये किमतीच्या साहित्याची चोरी झाली आहे. त्यांच्या बाजूला सुप्रिया भिकाजी दाभोळे यांच्या फळ विक्रीच्या दुकानातील साहित्यासह १०००-/ रोख रक्कम लंपास केली. गौरव ढेंगे यांच्या शिवतुल्य चहा दुकानातून ३०० रूपये रोख रक्कम तसेच संग्राम वडिंगेकर यांच्या एस.एस.वेट जनावारांच्या मेडीकल दुकानातील काऊंटर मधील ५००००-/ रोख रक्कमे सह दुकानात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेरॅची तोडफोड केली आहे. गेल्या पंधरा दिवसापुर्वी या ठिकाणी कांही दुकानात किरकोळ चोरी झाली होती. गजबजलेल्या चौकात बुधवारी मध्यरात्री पुन्हा धाडसी चोरी झाल्याने परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी युवराज राजिगरे, किरण पाटील,पोलिस पाटील तुकाराम सुतार,सुनिल पाटील उपस्थित होते. सदर घटनेची कागल पोलिसात नोंद झाली असून अधिक तपास जे.एच.कुरणे,मुनाफ मुल्ला करीत आहेत.






# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत सेना, भाजप युतीमुळे कार्यकर्त्यांची पंचाईत !

## मशाल, तुतारी आणि पंजा यांना मिळणारा वाढता प्रतिसाद...!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

वैजापुर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत शिवसेना,भाजप युतीमुळे स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांची मोठी पंचाईत झाल्याचे चित्र दिसून येत आहे.अनेक ठिकाणी दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते एकमेकांविरुद्ध लढत आ-लेले असताना,अचानक झालेल्या युतीमुळे नेमके कोणासाठी काम करायचे,कोणाचा प्रचार करायचा, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. वर्षानुवर्षे पक्ष वाढीसाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांना उमेदवारी वाटपात डावलले गेले असल्याची भावना आहे. काही ठिकाणी नाराजी,तर काही ठिकाणी बंडखोरीचे सुर उमटत असून,याचा थेट परिणाम निवडणूक प्रचारावर होताना दिसणार आहे. कार्यकर्त्यांचा उत्साह कमी झाल्याने युतीच्या उमेदवारांसमोर अडचणी उभ्या राहिल्या आहेत. नेतृत्व पातळीवर युतीचा निर्णय जरी राजकीयदृष्ट्या फायदेशीर वाटत असला,तरी तळागाळातील कार्यकर्त्यांचे मनोबल टिकवणे हे मोठे आव्हान ठरत आहे. वेळेत संवाद साधून नाराजी दुर न केल्यास,याचा फटका युतीला निवडणूक निकालात बसू शकतो,अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

युती झाल्याने दोन्ही पक्षांच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षे एकमेकांविरोधात राजकीय संघर्ष करणारे कार्यकर्ते अचानक एका व्यासपीठावर दिसणार आल्याने नेमकी भुमिका काय असावी, याबाबत स्पष्टता नसल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. ग्रामीण भागात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका या कार्यकर्त्यांच्या ताकदीवरच लढवल्या जातात. मात्र युतीच्या निर्णयामुळे अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांना उमेदवारीपासून वंचित राहावे लागले आहे. युतीमुळे विरोधकांवर मात करण्याचा नेतृत्वाचा प्रयत्न असला तरी तळागाळातील कार्यकर्त्यांचा उत्साह कमी झाल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. अनेक कार्यकर्ते थांबा आणि पाहा ची भुमिका घेत असल्याची चर्चा आहे. नेतृत्व पातळीवर युतीचा निर्णय घेतला गेला असला, तरी स्थानिक पातळीवर पक्षासाठी अहोरात्र मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्यांना विश्वासात न घेतल्याने नाराजी वाढत चालली आहे. याचा थेट परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर व निकालावर होण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. कार्यकर्त्यांना सोबत न घेतल्यास सेना-भाजप युतीला जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत अपेक्षित यश मिळेल का,हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती


**रोखठोक**
**शांताराम मगर मो. ९४२१४१७५४०**

निवडणुका म्हणजे ग्रामीण राजकारणाची खरी परीक्षा.ही परीक्षा फक्त नेत्यांची नसते,तर कार्यकर्ते, मतदार आणि स्थानिक नेतृत्व यांच्या विश्वासाची असते.मात्र याच निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीने राजकीय गणित जुळवण्याच्या नादात तळागाळातील वास्तवाकडे दुर्लक्ष केल्याचे चित्र दिसत आहे. वर्षानुवर्षे एकमेकांविरोधात लढणाऱ्या कार्यकर्त्यांना अचानक एका झेंड्याखाली उभे राहण्याचा आदेश देण्यात आला. पण राजकारण फक्त आदेशावर चालत नाही, ते भावनेवर,निष्ठेवर आणि आत्मसन्मानावर उभे असते. उमेदवारी वाटपात निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून 'सोयीस्कर' उमेदवार पुढे केल्याने असंतोष उफाळून आला आहे. युती सत्तेसाठी असली तरी कार्यकर्त्यांच्या मनात ती आत्मसन्मानाची माती करणारी ठरत आहे. या असंतोषाचे प्रतिबिंब निवडणूक प्रचारात स्पष्टपणे दिसणार आहे. कार्यकर्त्यांची अनास्था युतीच्या उमेदवारांसाठी चिंताजनक ठरत आहे. याउलट विरोधकांनी ही संधी अचूक हेरली असून,सत्तेसाठी तत्त्वांचा बळी हा मुद्दा मतदारांपर्यंत प्रभावीपणे पो-होचवला जात आहे.परिणामी मशाल, तुतारी आणि पंजा या चिन्हांकडे मतदारांचा कल वाढताना दिसतो आहे. ग्रामीण मतदार आता राजकीय सौद्यांना कंटाळलेला आहे. त्याला विकास हवा आहे,पण त्यासोबत स्वाभिमानही हवा आहे.पक्षनेतृत्वाने केलेल्या तडजोडींचा फटका थेट मतपेटीतून दिला जातो,हे यापूर्वीही अनेकदा सिद्ध झाले आहे. आज कार्यकर्त्यांची नाराजी हीच विरोधकांची ताकद बनत आहे आणि सत्ताधाऱ्यांसाठी ती डोकेदुखी ठरत आहे. या पार्श्वभूमीवर एक प्रश्न ठळकपणे उभा राहतो युती कोणासाठी? सत्तेसाठी की कार्यकर्त्यांसाठी? जर नेतृत्वाने वेळेत आत्मपरीक्षण केले नाही, तर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका सेना,भाजप युतीसाठी धोक्याची घंटा ठरू शकतात.कारण इतिहास सांगतो, तळागाळातील आवाज दुर्लक्षित करणाऱ्या युती फार काळ टिकत नाहीत.त्या मतदारच विसर्जित करतो.

नेतृत्वाच्या बंद खोलीत ठरलेली युती तळागाळातील कार्यकर्त्यांच्या गळ्यात मात्र जबरदस्तीने अडकवण्यात आली, हेच आजचे वास्तव आहे. तळागाळातील असंतोष वर्षानुवर्षे एकमेकांविरोधात संघर्ष करणारे कार्यकर्ते एका झटक्यात मित्र कसे होणार,हा प्रश्न कुणीच विचारात घेतला नाही.उमेदवारी वाटपात निष्ठेला दुय्यम स्थान देऊन सोयीस्कर समीकरणांना प्राधान्य देण्यात आले. परिणामी आम्ही पक्षासाठी झटलो. पण लाभ दुसऱ्यालाच.अशी भावना निर्माण झाली. याच नाराजीचा फायदा घेत विर-ोधी पक्षांनी मैदान मारायला सुरुवात केली आहे. मशाल,तुतारी आणि पंजा या चिन्हांकडे मतदारांचा ओढा वाढत आहे,कारण मतदारांना सत्तेसाठी होणारे राजकीय सौदे नको आहेत, तर स्थानिक प्रश्नांसाठी लढणारे चेहरे हवेत.

# पुणे येथे पार पडलेल्या अबॅकस परीक्षेत इरा इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे इंटरनॅशनल लेव्हलमध्ये पदार्पण

**दै. आवाज वृत्तसेवा...**

भगवान पवार, सटाणा (प्रतिनिधी) - सटाणा : दि. १८ जानेवारी रोजी पुणे येथे पार पडलेल्या अबॅकस परीक्षेत इरा इंटरनॅशनल स्कूल, केरसाने येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

अबॅकसच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्ता, मेहनत व सातत्याच्या जोरावर नॅशनल लेव्हल परीक्षेत घवघवीत यश मिळवले. या यशाच्या बळावर विद्यार्थ्यांनी आता इंटरनॅशनल लेव्हल स्पर्धेत यशस्वी पदार्पण केले असून या परीक्षेत शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण प्राप्त करत विजेतेपद पटकावले आहे.

अबॅकस शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची गणितीय क्षमता, एकाग्रता, स्मरणशक्ती व वेगवान विचारशक्ती अधिक सक्षम होत असल्याचे या यशातून स्पष्ट झाले आहे.




या घवघवीत यशाबद्दल शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष मा. पियुष बिरारी, सरचिटणीस मा. नरेंद्र मोरे , संचालिका दिपाली मोरे , संचालिका प्रांजल बिरारी , तसेच मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या यशामागे मार्गदर्शक शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व पालकांचे मोलाचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत असून येणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

भविष्यातही अशा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये इरा इंटरनॅशनल स्कूलचे विद्यार्थी उज्ज्वल यश संपादन करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# येवल्या च्या भूमिपुत्राचा पुणे महानगर पालिकेवर झेंडा... खाडे कुटुंबाचा सलग तिसरा विजय

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी

येवला- तालुक्यातील दुर्गम भागा-तील युवक पुण्या सारख्या शहरात जाऊन आपला राजकीय जम बसवतो, इतकेच नव्हे तर २००४ पासून सातत्याने पुणे महानगर पालिकेवर निवडून येतो...

पन्हाळसाठे तालूका येवला येथील भुमिपुत्र असलेले दत्ता खाडे स्वतः २००४ ला नगरसेवक झाले. पत्नी निलिमा खाडे याही २०१६ ला नगरसेविका झाल्या. पुण्यातील उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या शिवाजीनगर, डेक्कन जिमखाना, मॉडेल कॉलनी या परिसरात आपल्याला कार्य कर्तृत्वाने आणि भारतीय जनता पक्षाशी एकनिष्ठ राहिल्याने आता पुढच्या पिढीतील अपुर्व खाडे यांनी मॉडेल कॉलनी प्रभागा मधून मोठा विजय मिळवला आहे.



पुण्यात व्यावसायिक आणि राजकीय कारकीर्द घडली असली तरी खाडे कुटुंब आपल्या पन्हाळसाठे गावाला विसरले नाहीत. वेळोवेळी गावात विविध विकास कामासाठी त्यांनी भरीव योगदान दिले आहे. गावातून अपूर्व खाडे त्यांच्या निवडीबद्दल आनंद साजरा केला आहे.

# निवड श्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणी त्वरित मंजूर होणार - ओंकार पवार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक - नाशिक जिल्हा शिक्षक समितीच्या शिष्टमंडळाने आनंदा कांदळकर राज्य उपाध्यक्ष यांच्या नेतृत्वा खाली मुख्य कार्यकारी अधिकारी मा. ओमकार पवार साहेब, शिक्षणाधिकारी माननीय श्रीमती सरोज जगताप मॅडम यांची भेट घेतली असता खा-लील विषयावर चर्चा करण्यात आली निवड श्रेणीचे प्रस्ताव संपूर्ण काम झाले असून ३० तारखेपर्यंत अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.वरिष्ठ वेतनश्रेणीचे प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी पाठवण्यात आलेले होती. परंतु सामान्य प्रशासनाने नवीन नमुन्यात एक्सएल मध्ये माहिती मागवली असल्याने सदर माहिती जमा करण्याचे काम चालू आहे. सदर ३६ शिक्षकांचे स्थायित्व प्रकरणे त्वरित मंजूर करण्यात येतील असे आश्वासन शिक्षणाधिकारी मॅडम यांनी दिले.

शिक्षणाधिकारी मॅडम यांच्याकडे जेवढी मेडिकल बिल




प्राप्त झाली ती सर्व मंजूर करण्यात आलेले असून मेडिकल बिलाबाबत आवश्यक निधीची मागणी करण्यात आले-ली आहे. १५ फेब्रुवारी पर्यंत सदर निधी वाटप करण्यात येईल.

कंत्राटी शिक्षकांचे वेतन - कंत्राटी शिक्षकांच्या वेतना संदर्भात इगतपुरी व दिंडोरी यांचे नोव्हेंबर पर्यंतचे वेतन येत्या दोन दिवसात होणारा असून इतर तालुक्यातून वेतन मागणी मागवलेली आहे.मालेगाव तालुक्यातील २५ शिक्षकांना कार्यमुक्त करण्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात आली. सदर कर्मचारी शिक्षकांना पुढील आठवड्यात कार्यमुक्त करण्यात येईल असे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले.

याप्रसंगी विभागीय अध्यक्ष सुनील भामरे, माजी राज्य उपाध्यक्ष पांडुरंग कर्डिले,जिल्हाध्यक्ष जिभाऊ बच्छाव, जिल्हा सरचिटणीस साहेबराव पवार, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष शिवाजी बर्गे, जिल्हा कोषाध्यक्ष शैलेश आहेर व सुनील सांगळे, जिल्हा ऑडिटर बुद्धेसिंग ठोके, जिल्हा पदाधिकारी प्रल्हाद निकम, निफाड तालुका अध्यक्ष संजय गवळी आदी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# मोराळापाडा येथील घराला लागलेल्या आगीमध्ये नुकसान झालेल्या कुटुंबाला शासनाकडून घरपोच धान्य वाटप

**दै. आवाज वृत्तसेवा...**

भगवान पवार, सटाणा (प्रतिनिधी) सटाणा: बागलाण तालुक्यातील मानुर मोराळापाडा येथील आदिवासी शेतकरी लक्ष्मण यादु भोये यांच्या घराला लागलेल्या आगीमध्ये साडेचार लाख रुपये रोख रकमेसह संसार उपयोगी वस्तूंसह मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, त्या घराला लागलेल्या आगीमध्ये नुकसान झालेल्या कुटुंबाला बागलाण चे तहसीलदार कैलास चावडे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन नुकसानग्रस्त घराची पाहणी केली. यावेळी कुटुंबाला धीर देत शासनाकडून तुम्हाला घरपोच धान्य दिले जाईल तसेच आगीमध्ये जळून गेलेले शासकीय कागदपत्रासाठी नवीन उपलब्ध करून देण्यासाठी तहसील कार्यालयातुन कुठलेही अडचण येणार नाही असे तहसीलदार कैलास चावडे यांनी पडीत कुटुंबाला आश्वासन दिले.

यावेळी बागलाण तलाठी संघटने तर्फे २१ हजाराची रोख रक्कम व संसार उपयोगी साहित्य तहसीलदार कैलास चावडे यांच्या उपस्थित बागलाण तालुका तलाठी संघटनेचे अध्यक्ष मंडळ अधिकारी



**आगीमध्ये नुकसान झालेल्या पीडित कुटुंबांला शासनाकडून कुठलेही तरतूद नसल्यामुळे शासनाकडून त्या कुटुंबाला घरपोच धान्य दिल जाईल घराची पाहणी केली असता घराचा लाकडी भाग संपूर्ण जळून खाक झाला टेक्चर तसंच उभ आहे त्यांनी येणाऱ्या आर्थिक मदतीतून घरांवर पत्रे टाकून पीडित कुटुंबाची सोय होऊन जाईल तसेच जळालेल्या रोख साडेचार लाख रुपये संबंधित विभागाशी संपर्क साधून त्यांना त्या नोटा बदलून देण्यासाठी प्रयत्न करेल**

**– कैलास चावडे (तहसीलदार, बागलाण)**

वसंत शिरसाठ, महसूल सहाय्यक सिकंदर खैरनार यांच्या हस्ते पीडित कुटुंब लक्ष्मण भोये यांच्या कडे देण्यात आले यावेळी तहसीलदार कैलास चावडे यांनी आगीमध्ये जळालेल्या घराची पाहणी केली तसेच रोख रक्कम साडेचार लाख असलेल्या कपाटाची पाहणी तहसीलदार कैलास चावडे यांनी केली. यावेळी बागलाण तलाठी संघटनेचे अध्यक्ष वसंत शिरसाठ, महसूल सहाय्यक सिकंदर खैरनार, मानुर महसूल अधिकारी आर. यु. पालवी, ग्रामसेवक आर. पी. ठाकरे,पोलीस पाटील बारकू पाटील, सरपंच पंडित अहिरे आधी ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# साकोरे येथील विद्यालयात हळदी–कुंकू समारंभ संपन्न



**दै. आवाज वृत्तसेवा...**

पेङकाई माता सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या माध्यमिक विद्यालय साकोरे येथे हळदी कुंकू समारंभ संपन्न झाला माता पालक समिती पदाधिकारी व सदस्य महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या सावित्रीबाई फुले, सरस्वती, पेङकाई माता पतिमा पूजन करुन करण्यात आली कार्यक्रम प्रास्ताविक पूनम बोरसे यांनी केले.

हळदी – कुंकू समारंभ का आयोजित केला त्या मागचा हेतू स्पष्ट करून माता भगिनी चे विविध खेळ घेण्यात आले यासाठी विशेष योगदान हेमलता पवार व शितल रंधे मॅडम यांनी केले. समारोप वेळी हळदी कुंकू लावून वाण व तिळगुळ वाटप करण्यात आला शेवटी चहापाण करुन ऐकमेकास शुभेच्छा देऊन आनंदाने पुन्हा भेटू व विद्यालया कडून महिलांना बोलवून जो आनंद दिला असेच वर्षा मधून वेळप्रसंगी कार्यक्रम आयोजित करावे ही सूचना पण केली कार्यक्रमाच्या सुरवाती मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेत्तर वृंद यांनी शुभेच्छा देऊन स्वागत केले.

# शिक्षणा सोबत कला आणि संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यात विद्यालयांचा मोलाचा वाटा – शेफाली भुजबळ

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी शिक्षणासोबतच कला आणि संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यात विद्यालयांचा मोलाचा वाटा आहे.तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मिडिया आणि मोबाईल चा वापर विद्यार्थ्यांनी फक्त आणि फक्त अभ्यासासाठी करणे गरजेचे आहे.असे प्रतिपादन शेफालीताई भुजबळ यांनी केले आहे.सायगाव(ता.येवला)येथील सरस्वती विद्यालयात वार्षिक स्नेह संमेलन व सांस्कृतिक कार्यक्रमात त्या बोलत होत्या.सरस्वती विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन बुधवार ता.२१ उत्साहात पार पडला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून शेफालीताई भुजबळ उपस्थित होत्या.तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून नाशिक विभागीय बोर्डाचे सचिव मोहन देसले, येवल्याचे पोलीस निरीक्षक संदीप मंडलिक उपस्थित होते.तसेच व्यासपीठावर विखरणीच्या सरपंच ज्योती शेलार, सायगांवच्या सरपंच रेखा जानराव, मजूर सोसायटीच्या संचालिका



सविता धनवटे,मंत्री भुजबळ यांचे स्वियसहायक बाळासाहेब लोखंडे,संस्थेचे अध्यक्ष रामेश्वर कुळधर, सचिव बी.बी. गायकवाड, मुख्याध्यापक अशोक शेलार, सेवानवृत्त कृषिअधिकारी अशोक कुळधर, विठ्ठल पैठणकर, मच्छिंद्र बारे, सुभाष भालेराव, विजय खैरनार, डॉ.बाबासाहेब खैरनार, वसंतराव निघुट आदी मान्यवर उपस्थित होते. समूह नृत्य, विविध क्रिडा स्पर्ध व सांस्कृतिक कार्यक्रम यावेळी पार पडले. विद्यालयाच्यावतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश देवरे यांनी केले. तर बी.डी.पैठणकर यांनी आभार मानले.

# नाशिक महापौरपदाच्या शर्यतीत 'दिपाली गीते' यांचे नाव चर्चेत

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विश्वजीत शहाणे नाशिक :प्रतिनिधी नाशिक महानगरपालिकेचे महापौर पद आगामी काळासाठी 'खुल्या प्रवर्गातील महिला' गटासाठी राखीव झाल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. या आरक्षणामुळे अनेक पुरुष इच्छुकांना माघार घ्यावी लागली असली तरी, भारतीय जनता पक्षातील महिला नगरसेविकांमध्ये मोठी चुरस निर्माण झाली आहे. या शर्यतीत सर्वाधिक मताधिक्क्याने निवडून आलेल्या अभ्यासू नगरसेविका सौ. दिपाली गणेश गीते यांचे नाव सध्या आघाडीवर असल्याचे बोलले जात आहे.

आरक्षणामुळे इच्छुकांचा हिरमोड, महिलांमध्ये स्पर्धा नाशिक महापालिकेत ५० टक्के आरक्षणामुळे एकूण ६७ महिला प्रतिनिधी निवडून आल्या आहेत. त्यातच भाजपकडे ७२ जागांचे स्पष्ट बहुमत असल्याने महापौर भाजपचाच होणार हे निश्चित आहे. यापूर्वी डॉ. शोभा बच्छाव, रंजना भानसी आणि नयना घोलप या महिलांनी हे पद भूषविले आहे. आता पुन्हा महिला आरक्षण



आल्याने पक्षातील ज्येष्ठ आणि सक्षम महिला नेतृत्वाला संधी मिळणार आहे. दिपाली गीते यांच्या जमेच्या बाजू राजकीय वर्तुळात दिपाली गीते यांच्या नावाची चर्चा होण्यामागे काही महत्त्वाची कारणे आहेत:

✻ विक्रमी मताधिक्क्य: दिपाली गीते यांनी केवळ निवडणूक जिंकली नाही, तर संपूर्ण शहरात विक्रमी मताधिक्क्य मिळवून आपल्या लोकप्रियतेचा पुरावा दिला आहे.

✻ राजकीय वारसा आणि अनुभव: त्यांचे पती तथा माजी स्थायी समिती सभापती गणेश गीते यांच्या प्रशासकीय अनुभवाचा आणि दांडग्या जनसंपर्काचा त्यांना मोठा आधार आहे.

✻ संकटमोचकांचा विश्वास: दिपाली गीते यांना राज्याचे दिग्गज नेते ना. गिरीश महाजन यांच्या निकटवर्तीय मानले जाते. महाजन यांचा विश्वास संपादन केलेले नेतृत्व असल्याने नाशिकच्या विकासासाठी राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणावर निधी मिळवण्यात त्या यशस्वी ठरतील, असा विश्वास कार्यकर्त्यांना वाटतो. 'व्हिजन' असलेले नेतृत्व दिपाली गीते यांचा शहराच्या पायाभूत सुविधा, आरोग्य आणि महिला सक्षमीकरणाबाबतचा अभ्यास दांडगा आहे. प्रशासनावर पकड ठेवण्याची क्षमता आणि मनपा कामकाजाची जाण असलेला 'शिक्षित चेहरा' म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे.

गिरीश महाजन कोणाच्या पारड्यात माप टाकणार? नाशिकच्या राजकारणाची सर्व सूत्रे सध्या कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या हाती आहेत. भाजपमधील अनेक ज्येष्ठ महिला नगरसेविका या पदासाठी इच्छुक असताना, महाजन कोणाचे नाव निश्चित करतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दिपाली गीते यांच्या नावाची चर्चा सुरू झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, पक्षश्रेष्ठींच्या अंतिम निर्णयाची प्रतीक्षा आहे.

# सटाण्यात देवमामलेदार मॅरेथॉन उत्साहात यशस्वी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

भगवान पवार, सटाणा (प्रतिनिधी) – सटाणा: शहरात साई सावली फाउंडेशन व आवाज कसमादेचा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली देवमामलेदार मॅरेथॉन मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. तालुक्यासह राज्यातील तरुणाईसह विविध वयोगटातील धावपटूंनी या मॅरेथॉनमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या मॅरेथॉन स्पर्धेचा शुभारंभ सटाणा शहराच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष हर्षदा राहुल पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. यावेळी नगरसेवक सिमा सोनवणे, चेतन रौदळ, विलास दंडगव्हाळ, जयश्री गरुड, वनपरिक्षेत्र अधिकारी आमले, पोलीस उपनिरीक्षक अमोल सूर्यवंशी, वात्सल्य हॉस्पिटलचे संचालक राहुल सोनवणे, सिम्स हॉस्पिटलचे संचालक संदेश निकम, तेजल मेडिकलचे संचालक



प्रदीप बच्छाव, अपेक्स हॉस्पिटलचे संचालक प्रवीण खैरनार, दिनेश कांकरिया आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

मॅरेथॉनच्या आयोजनासाठी साई सावली फाउंडेशन, बागलाण सायकल फाऊंडेशन अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस व इतर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच संपूर्ण मार्गावर स्वयंसेवक, पोलीस प्रशासन व वैद्यकीय पथक तैनात ठेवण्यात आले होते. सहभागी धावपटूंच्या सुरक्षिततेसह आरोग्याचीही विशेष काळजी घेण्यात आली होती. या मॅरेथॉनमध्ये १० किमी, ५ किमी आणि ३ किमी अशा तीन गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेच्या शेवटी विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




**१० किमी गटातील विजेते**

प्रथम : अतुल शांताराम बर्डे

द्वितीय : गोविंद प्रकाश पाडेकर

तृतीय : दत्ता धनंजय आढाव

**५ किमी गटातील विजेते**

प्रथम : तेजस विलास सपकाळे

द्वितीय : कुणाल लक्ष्मण ब्राह्मणे

तृतीय : कृष्णानाथ शंकरनाथ योगी

**३ किमी गटातील विजेते**

प्रथम : आकाश रामेश्वर राठोड

द्वितीय : प्रतीक जावळे

मॅरेथॉनच्या माध्यमातून आरोग्य, फिटनेस व सामाजिक जागृतीचा संदेश देण्यात आला. अशा उपक्रमांमुळे शहरातील युवकांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण होत असून, सटाणा शहराच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# सुरगाणा तालुक्यातील शेतकरी बांधवांचा बेमुदत पायी लाँग मार्च, आज नाशिकमध्ये धडकणार !

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण पवार, हतगड..सुरगाणा तालुक्यातील शेतकरी बांधवांचा बेमुदत पायी लाँग मार्च अखेर नाशिकच्या वेशीवर मुक्कामासाठी पोहचला आहे. दिंडोरी येथील कांदा मार्केट परिसरात आंदोलकांनी मुक्काम राहण्याचा निर्णय घेत. दरम्यान सकाळी पांडाणे पासून शेतकऱ्यांचा लाँग मार्च नाशिककडे निघाला, पाच ते सहा हजार शेतकरी रस्त्याने पायी पाई नाशिककडे आगेकूच करत निघाले. वणी येथील भगवान बिरसा मुंडा चौकात महाराष्ट्राचे शेतकरी नेते कॉ.जे. पी.गावित आणि आंदोलकांचा नागरिकांकडून जंगी सत्कार करण्यात आला. त्यानंतर वणी शहराचे सरपंच मधुकर भरसट यांनी जोरदार सत्कार करून शेतकरी कष्टकऱ्यांच्या आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला. शेतकऱ्यांच्या अत्यंत ज्वलंत आणि महत्वाच्या प्रश्नांचा मार्ग मोकळा करून शेतकरी बांधवांना न्याय दिला पाहिजे, घटनेच्या नियमात बसणाऱ्या हक्काची मागणी शेतकरी आंदोलक करत आहे, हक्काची वनजमिन, हक्काची वीज, हक्काचे पाणी, पेसा कायद्यातील



युवकांची नोकर भरती, जिल्हा परिषद व आश्रमशाळांमधील शिक्षक व इतर कर्मचारी भरती करावी.ग्रामीण भासगातील गोर गरीब जनतेच्या मुलांना शिक्षनाच्या प्रवाहात आणावे, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव द्यावा, फ़ॉरेस्ट प्लॉट धारकांना बोनस द्यावा. अशा विधायक मागण्या घेऊन हे आंदोलक गेल्या पाच दिवसापासून थंडी गारठ्यात रस्त्यावर मुक्काम करून वाटचाल करीत आहेत, मात्र गेंड्याच्या कातडीचे महाराष्ट्र सरकार आणि निष्काळजी जिल्हा प्रशासन आंदोलकांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आसल्याने, सुरगाणा तालुक्यातील शेतकरी आंदोलक आज नाशिकच्या वेशिवर पोहचले आहेत.

दिंडोरी येथे सुरगाना आणि दिंडोरी तालुका मिळून जवळपास दहा हजार आंदोलक मुक्कामासाठी एकत्र आले असून उद्या दिनांक २३ जानेवारी रोजी यात पुन्हा पेठ, कळवण, चांदवड, देवळा सटाणा आणि इगतपुरी व इतर तालुक्यातील किसान सभा आंदोलकांची भर पडणार असून वीस ते पंचवीस हजाराच्या जवळपास आंदोलक जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकनार आहेत. त्यामुळे उद्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मारणाऱ्या पायी किसान लाँग मार्च मोर्च्याकडे संबंध महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# साके पायी दिंडी पंढरपूरला मार्गस्थ



**दै. आवाज वृत्तसेवा...**

जे.के.गोरंबेकर / गोरंबे - साके ता.कागल येथील श्री विठ्ठल रूक्मीनी वारकरी सांप्रदाय व ग्रामस्थ सेवा मंडळाच्या वतीने मुखी हरिणाम आणि टाळ मृदंगाचा अखंड गजर करीत थंडी,उन वा-याची तमा न बाळगता पांडूरंगाच्या दर्शनासाठी वैकुंठवाशी श्री गुरू ज्ञानेश्वर माऊली सोपानकाका देहूकर महाराज पंढरपूर यांच्या कृपाशीर्वादाने व ह.भ.प.वैकुंठवाशी महादेव पाटील सांगावकर यांच्या प्रेरणेने माघ वारीसाठी 'विठ्ठल विठ्ठल, जय हरी विठ्ठल' च्या जयघोषात दिंडीचालक ह.भ.प.डॉ.कै.हिंदूराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार (ता.२०) रोजी साके ते पंढरपूर पायी दिंडी विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरला मार्गस्थ झाली. पहाटे काकडाआरती, विठ्ठल रूक्माई,विना - तुळस पुजन श्रीम.छाया पाटील,सचिन पाटील,मच्छिंद्र पाटील,तुकाराम पाटील यांचे हस्ते करण्यात आले. यंदा पायी दिंडीचे यंदाचे २४ वे वर्षे आहे. मंगळवार दि २० जानेवारी ते मंगळवार दि.२८ जानेवारी पर्यंत सलग ७ दिवस पायी दिंडी साके,पट्टणकडोली,जयसिंगपुर,भोसेफाटा, कुची,जुनोनी,कमलापूर,खर्डी या मार्गावरून दिंडी पंढरपुर मुक्कामी विठ्ठल दर्शनासाठी पोहचणार आहे. दिंडी संयोजक गणपती पाटील,विशाल चौगले, पांडूरंग पाटील,संदिप पाटील, जयवंत चौगले, मधुकर जाधव, शरद पाटील, समित घराळ, संतोष गवसे, राजू कुळवमोडे, अजित निऊंगरे, संदिप खराडे,सुजित सातुसे, अनिल पाटील, बाळासो पाटील यांनी केले.

विणेकरी ह.भ.प तुकाराम बाळकू पाटील, काकडा व हरिपाठ धनाजी जाधव, साताप्पा पाटील, मृदंग साथ समाधान कोराणे चोपदार संतोष पाटील व हरिपाठ मंडळ साके यांचा सहभाग आहे.

# पिंपळगाव लेप शाळेचा स्तुत्य उत्पादक उपक्रम मोरिंगा पावडर प्रदर्शन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी -

येथील जिल्हा परिषदेच्या पिंपळगाव लेप शाळेने कार्यानुभव विषय अंतर्गत उत्पादक उपक्रमात अतिशय आगळा वेगळा उपक्रम तालुकास्तरीय जि.प.अध्यक्ष चषक स्पर्धेच्या ठिकाणी प्रदर्शन व विक्री चा स्टॉल लावून सादर केलेला आहे.या उत्पादक उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वत:वस्तू तयार करून विक्रीचा अनुभव घेतला.स्टॉलला अनेक मान्यवरांनी भेट देऊन आपला अभिप्राय नोंदवला व वस्तू खरेदी करून शाळेला सहकार्य केले.यावेळी संदिप



वायाळ,गटविकास अधिकारी, येवला संजय कुसाळकर,गटशिक्षण अधिकारी, मनिषा वाकचौरे शिक्षण,जालिंदर सोनवणे, मुख्याध्यापक जि.प.शाळा पिंपळगाव लेप यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यानुभव निदेशक बाबासाहेब गोरे,विद्यार्थीनीअंजली दौंडे,वैष्णवी फडे यांनी सादरीकरण केले. नईम मन्यार यांनी डिजाइनिंग मार्केटिंग केले.शाळा व्यवस्थापन समिती,सर्व शिक्षक वृंद व सर्व विद्यार्थी जि.प.शाळा पिंपळगाव लेप यांचे सहकार्य केले.मॉरिंगेशिए कुळातल्या मॉरिंगा प्रजातीतील सर्वाधिक आढळणाऱ्या जातीची वनस्पती असून उष्ण कटिबंधीय व समशीतोष्ण कटिबंधीय प्रदेशांत आढळणारा हा वृक्ष १० मी. उंचीपर्यंत वाढतो.याच्या फुले,पाने तसेच शेंगांचा पाककृती बनवण्यासाठी वापर होतो.याला विदर्भातील झाडीप्रांतात मुंगनाअसे म्हणतात.याचा उपयोग शेवग्याच्या पानांमध्ये ब जीवनसत्त्व हे तत्त्व विपुल प्रमाणात असते. त्यामुळे 'तोंड येणे'या आजारात शेवग्याच्या पानांचे आहारातून सेवन लाभदायक आहे.शेवग्याची मुळे जंतनाशक असतात. शेवगाची पाने आरोग्यवर्धक आहेत.शेवग्याच्या पानांचा आहारात उपयोग जसे आपण शेवग्याच्या शेंगांची भाजी करतो तसेच त्याच्या पाना पासून विविध पदार्थ बनवले जाते. जसे की पानांची भाजी,शेव,चिक्की,आदी पदार्थ बनवले जातात.शेवग्याच्या पानांची पावडर आरोग्यास खूप गुणकारी आहे. जर आपण सकाळी अनुषापोटी कोमट पाण्यात१चमचा पानांची पावडर घेतली तर शेवग्याच्या पानांमध्ये कॅल्शियम, पोटॅशियम,लोह,मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि जास्त मुबलक प्रमाणात असते.या पानांमध्ये पालकापेक्षा तिप्पट लोह असते.

# समस्यांचा महाशिक्षक दरबार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी नासिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर भाऊ दराडे यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक विभागीय उपसंचालक कार्यालय नाशिकरोड ,नाशिक येथे शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या व कामा संबंधित शेकडो शिक्षकांच्या उपस्थित महाशिक्षक दरबार संपन्न झाला..

यावेळी नाशिक जिल्ह्यातील शिक्षकांसह नाशिक विभागातील शिक्षक मोठ्या संख्येने समस्या घेवून उपस्थित होते .यात महिलांचा सहभाग उल्लेखनीय होता . माननीय आमदार किशोर भाऊ दराडे, उपसंचालक संजय कुमार राठोड, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी सरोज जगताप मॅडम ,उपशिक्षणाधिकारी व कर्मचारी यांच्यासमोर शिक्षकांनी अक्षरशः कामांचा व समस्यांचा पाऊस पाडला.

शिक्षकांच्या भावना अत्यंत तीव्र असल्यामुळे सभेने उग्र स्वरूप धारण केले. उपसंचालक कार्यालयातून आमदार साहेबांनी वॉक आऊट करून समोरील मैदानावरती ठिय्या दिला. शालार्थ आयडी,शिक्षक मान्यता, पुरवणी बीले, अंशतः अनुदानित कर्मचाऱ्यांच्या समस्या, एक स्तर समस्या, कला



शिक्षकांच्या समस्या, सेवा सातत्य ,बदली मान्यता यासारख्या अनेक दिवसापासून प्रलंबित समस्या शिक्षकांनी सर्वांसमोर मांडल्या. अश्रू वाहत महिला कर्मचाऱ्यांनी व्यथा मांडल्या.

आमदार किशोर भाऊ दराडे यांनी उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांना जनभावनेचा विचार करा अन्यथा मला विधानपरिषदेत कारवाई करावी लागेल अशा कडक शब्दात सूचना दिल्या. २८ फेब्रुवारी पर्यंत उपसंचालक कार्यालय व शिक्षण अधिकारी कार्यालयातून सर्व समस्यांचे निरसन होण्याची दोन्ही अधिकाऱ्याकडून ग्वाही घेतली.

जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटना, शिक्षकेतर संघटना प्रमुख व शिक्षक बांधव मोठ्या संख्येने समस्या घेऊन उपस्थित होते.

यात प्रामुख्याने मुख्याध्यापक संघाचे- एस.बी .देशमुख, प्रदीप सांगळे गोरख कुनगर, शिक्षक सेनेचे ,संजय चव्हाण,एम के वाघ ,हेमंत पाटील, कलीम अन्सारी, ढअऋ चे- मोहनराव चकोर, त्रंबक मार्कंड .शिक्षक परिषदेचे -विजय बडे,अमोल अहिरे ,कास्ट्राईब संघटनेचे -निलेश गांगुर्डे, कला संघटनेचे - सांगळे सर, शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे- सोमनाथ धात्रक, संग्राम करंजकर, शिक्षक भारतीचे -भाबड सर, ज्युनिअर कॉलेज संघटना, ग्रंथपाल संघटनेचे -शामराव गायधनी सर्वांनी चर्चेत सहभाग घेऊन विविध विषयांवरती चर्चा केली.




दररोज वाचा दैनिक आवाज